**आदेश नि. सी–४**

१) प्रस्तुतच्या प्रकरणात आजरोजी प्रतिवादी हयांनी अर्ज दाखल करून अभिलेखावर कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मागितली. कागदपत्रे अभिलेखावर दाखल न झाल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होवू शकते असे प्रतिपादन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२) प्रस्तुतच्या अर्जावर तक्रारदारांनी जोरदार हरकत नोंदवून हे स्पष्ट केले आहे की, या स्थितीला हा अर्ज पुर्णपणे चुकीचा ठरतो कारण की, या प्रकरणात कोणतेही तथ्य नसल्यामुळे आणि गुण नसल्यामुळे प्रतिवादी ही कागदपत्रे दाखल करीत आहेत, जे पुर्णपणे चुकीचे आहेत. करीता अर्ज फेटाळण्यास पात्र ठरतो.

३) दोन्ही पक्षांचे कथन आणि अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांचे बारकाईने आणि सुक्ष्म पध्दतीने अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, प्रतिवादी हयांना जर अभिलेखावर कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देण्यात आली तर तक्रारदारांची कोणतीही अपरिमित हानी होणार नाही. उलटपक्षी, या कागदपत्रांमुळे प्रतिवादी आणि तक्रारदार ह्यांच्यातील वादासंबंधात तोडगा निघू शकेल. म्हणून प्रतिवादी हयांना कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येवून प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.01.20 16:56:17 +0530

**दिनांक :– २०/०१/२०२६** **(शार्दुल श. जहागीरदार)**

**न्यायाधीश,**

**ठिकाण :– बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**